प्रेस नोट

जैन मंदिरातील देवतांच्या मुर्तीवरील सोन्या चांदीच्या दागिण्यांची चोरी करणाऱ्या आरोपींना अटक केलेबाबत

आर.ए.के. मार्ग पोलीस ठाणे

दिनांक २२/०४/२०२५ रोजी २०:०० वा ते दिनांक २३/०४/२०२५ चे ०५:३० वा दरम्यान श्री शिवडी जैन संघ, मुळराज भवन, ३ रा माळा, ए.डी.मार्ग, शिवडी, मुंबई यांचे बंद जैन मंदिराचा कडी-कोयंडा तोडुन मंदीरामध्ये प्रवेश करून देवतांच्या मुर्तीवरील वेगवेगळया प्रकारचे दागिने ज्यात सोन्याचा टिका, सोन्याची कपटी, चांदीचे मुकुट व दानपेटीतील रोख रक्कम असे एकुण सोन्याचे अंदाजे १९० ग्रॅम वजनाचे दागिने व चांदीचे अंदाजे ७५० वजनाचे दागिने एकुण रक्कम ७,१५,००० रुपये असलेले दागिने चोरी करून अज्ञात आरोपी पळून गेले, म्हणुन फिर्यादी नामे विपिन छगनलाल लालन, वय ५७ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा.ठि. रुम नं.८०१, गिरणार टॉवर, रामटेकडी, मुंबई यांच्या तक्रारीवरून र.अ.कि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ९३/२०२५ कलम ३०५(अ), ३३१(४) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

यातील चोरी झालेल्या ठिकाणचे सिसिटिव्ही कॅमेरा व डिव्हिआरचे अज्ञात चोरटयांनी वायर कापुन नुकसान केले असल्यामुळे व आरोपीतांनी तोंडाला हातरूमाल बांधला असल्याने आरोपीतांचे व्यवस्थित वर्णन होवु शकत नव्हते. तसेच घटनास्थळापासून कॅमेरे बऱ्याच अंतरावर असल्यामुळे आरोपी निष्पन्न करणे अवघड होते. परंतु तपास पथकाने तपासात सातत्य राखुन घटनास्थळापासून आरोपीचे येण्या-जाण्याच्या मार्गावरील एकूण २९ ठिकाणावरील जवळपास ७० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. त्यावरून ०३ अज्ञात आरोपी निष्पण्ण करून आरोपीबाबत कौशल्यपुर्ण तांत्रिक तपास केला व त्याआधारे आरोपी हे गाव भाकरमोटी, ता.दांतीवाडा, जि.बनासकंठा राज्य गुजरात येथील असल्याचे निष्पन्न करून सलग तीन दिवस सापळा रचुन आरोपी नामे ०१) सुनीलसिंह सुरजसिंह दाभी, वय २३ वर्षे, रा.हातिंद्रा, ता. पालणपूर जि.बनासकंठा, ०२) राहुलसिंह प्रवीणसिंह वाघेला, वय २० वर्षे, रा.भाकरमोटी, ता.दांतीवाडा, जि.बनासकंठा व ०३) जिगरसिंह दिनेशसिंह वाघेला, वय १९ वर्षे, रा.भाकरमोटी, ता.दांतीवाडा, जि.बनासकंठा गुजरात राज्य यांना दिनांक ०२/०५/२०२५ रोजी ताब्यात घेण्यात येवुन आरोतांकडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करण्यात येवुन त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी मा पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा पोलीस सह आयुक्त श्री. सत्य नारायण, मा अपर पोलीस आयुक्त श्री अनिल पारसकर, मा पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ श्रीमती आर रागसुधा, मा सहायक पोलीस आयुक्त माटुंगा विभाग श्री योगेश गावडे यांचे मार्गदर्शनाखाली आर.ए.के. मार्ग पोलीस ठाणेचे वपोनि श्री संदीप रणदिवे, पो नि (गुन्हे) संदीप ऐदाळे, सपोनि महेश मोहिते, सपोनि गोविंद खैरे, सहा.फौजदार/सुरेश घार्गे, पोहवा/अनिल कोळेकर, पोहवा/ज्ञानेश्वर केकाण, पोहवा/काशीनाथ शिवमत, पोहवा/कमलेश शेडगे, पोशि/समिकांत म्हात्रे, किरण देशमुख, निखिल राणे, जितेंद्र परदेशी, पोह गोविंद ठोके यांनी केली.